!! श्री !!

शिवसेना

# खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ३४५/१८/०६/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# अधिसभा निवडणुकीत ( सिनेट ) मतदारांची नोंदणी मोठ्या संख्येने करा : आ. डॉ.राहुल पाटील

## भगवा फडकवण्यासाठी युवासैनिकांनी आत्तापासुनच कामाला लागण्याचे आवाहन

**संभाजीनगर : ( ता.०४ )** युवासैनिकांनी आदित्यजी ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अधिसभा सदस्य निवडणुकीत (सिनेट) भगवा फडकवण्यासाठी मराठवाड्यातील युवासैनिकांनी सज्ज व्हावे व सिनेट निवडणुकीत पदवीधर मतदारांची नोंदणी मोठ्या संख्येने करण्याचे आवाहन युवासेना संपर्कप्रमुख आमदार डॉ.राहुल पाटील यांनी बैठकीत केले. सुभेदारी विश्रामगृह येथे झालेल्या मराठवाडास्तरीय युवासैनिकांच्या बैठकित कोअर कमिटी सदस्य जगन्नाथ काकडे, ॲड. अमित गिते, गटनेते राजु वैद्य, सभागृहनेते राजेंद्र जंजाळ, जिल्हायुवाधिकारी ऋषिकेश खैरे, संतोष माने, तुकाराम सराफ, ऋषिकेश जैस्वाल, विजय सुबूकडे, पुनमचंद सलामपुरे आदिंची व्यासपीठावर उपस्थिती होती.

मराठवाडा हा शिवसेनेला मानणारा विभाग असुन आपल्या युवकांची मोठी फौज येथे तयार आहे. तांत्रिक गोष्टी समजुन घेतल्यास विजय निश्चित आपलच होईल. असा विश्वास गटनेते राजु वैद्य यांनी केला. आदित्य साहेबांचा आदेश सर्व युवासैनिकांनी पाळून आप आपल्या भागात मतदारांची नोंद करुन त्यांना आपल्या संपर्कात आणण्याची सुचना जगन्नाथ काकडे यांनी केली. तुकाराम सराफ आपला निवडणुकीतील अनुभव व्यक्त करतांना गाफील न राहता पूर्णपणे लक्ष केंद्रित करण्याचा सल्ला दिला. संभाजीनगर जिल्ह्यात सर्वात जास्त मतदार असुन जास्तीत जास्त मतदारांच्या भेटी घेऊन संपर्क साधण्याचे आवाहन राजेंद्र जंजाळ यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक युवासेना जिल्हायुवाधिकारी ऋषिकेश खैरे यांनी केले तर आभार संतोष माने यांनी मानले या बैठकिस तालुकाधिकारी उमेश मोकासे, बंडू शिंदे, शहरधिकारी सतीष पवार, किरण तुपे, नंदकुमार म्हस्के, भागीनाथ रिठे, दत्ता शेलार, अजय चोपडे, लखन ठाकुर, अंकुश ताठे, प्रफुल्ल शिंदे, किरण रेड्डी, प्रत्युक्ष कन्नडकर, शैलेश कानकाटे, अजय कदम, योगेश पाटील, राजु वायाळ, विशाल गायके, ज्ञानेश्वर तुपे, नारायण सुरे, बजरंग ठोकळ, अक्षय दाभाडे, संदिप खंबाट, शुभम ठाकुर, शुभम खोसरे, रोहित बावस्कर, अविनाश जाधव, सुमित पाटील, सतिष साठे, सुदाम शिंदे, गणेश तेलोरे, अरविंद कामतीकर आदिंसह युवासैनिकांची उपस्थिती होती.

प्रसिध्दी प्रमुख

गणेश वाघ / मनोज वडगावकर

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , yp4329@gmail.com , ydp4329@gmail.com , procbkhaire@gmail.com ganeshwagh4400@gmail.com

8421415255/9420404329 8484066606/9604384400